# सामाजिक मूल्य व भारतीय राज्यघटना

**डॉ. प्रकाश सुर्यभान सोनक**
विभाग प्रमुख, समाजशास्त्र,
यशोदा गर्ल्स आर्टस् ॲन्ड कॉमर्स कॉलेज,
स्नेहनगर, नागपूर.
Email : psonaksocial@gmail.com

---

## प्रस्तावना

आपण प्रथमता भारताचे नागरीक आहोत आणि शेवटी देखील आपण भारताचेच नागरीक आहोत. मधल्या ज्या काही गोष्टी समाजाने आपल्या मागे लावलेल्या आहेत. त्यामध्ये धर्म, जाती, प्रथा, परंपरा, कर्मकांड या आणि यासारख्या अनेक गोष्टींमध्ये आपण आयुष्यभर गुरफटत राहावे अशी काही सामाजिक आणि धार्मिकदृष्टया स्वतःला हूशार म्हणवून घेणाऱ्या लोकांचा एक वर्ग पिढयान्पिढया हेच कट कारस्थान करीत आहे. त्यामुळे आपण आपल्या सामाजिक मूल्यांपासून दूर जात आहोत आणि स्वार्थी बनून आपण आपल्या स्वार्थाकरिता जगत आहोत. परंतू या देशाला चालविणाऱ्या घटनेचा आपण ज्या पध्दतीने अनादर करीत आहोत. तो चुकत आहे का? याचा विचार करून आपण आली सामाजिक मूल्ये जपून इतरांना आपल्या बरोबरीने वागविणे, त्यांच्याशी वर्तन ठेवणे, सलोखा कायम ठेवणे, मानव म्हणून दूसऱ्या मानवाशी मानवतेचे नाते निर्माण करणे, यालाच थोडक्यात आपण सामाजिक मूल्य म्हटल्यास चूकीचे ठरणार नाही. ही नैतिकेतीची मूल्यच आपल्याला आज भारतीय राज्य घटनेने दिलेली आहेत.

मानवप्राण्यामध्ये वेळेप्रमाणे बदल दिसून येत आहेत. काल आणि आज सारखे नसून त्यात आज बदल झालेला दिसून येतो. परिवर्तन किंवा बदल हा देखील निसर्गाचा नियमच आहे. राष्ट्राचाही त्याला अपवाद असू शकत नाही. राजकीय, आर्थिक व सामाजिक परिस्थिती अनेक कारणांमुळे सारखी बदलतच असते. देशाचे संविधान तयार होत असताना जी परिस्थिती असते ती कालांतराने तशीच राहात नाही. स्वाभाविकच बदलत्या परिस्थितीनुसार संविधानात योग्य ते फेरफार करणे आवश्यक होऊ बसते. कालानुसार बदल स्वीकारणारी सविधानानेच दीर्घकाळ टिकतात तसा बदल न स्वीकारणारी संविधाने मात्र कालबाहय ठरून उलथून टाकली जाण्याचा धोका संभवतो. संविधानाचे शिल्पकार कितीही व्यासंगी, विद्वान आणि व्युत्पन्न मतीचे असले तरी त्यांच्याही दृष्टीवर मर्यादा असतातच. सामान्य माणसापेक्षा भवितव्यात अधिक दूरवर त्यांची कल्पनाशक्ती जाऊ शकते. तरीपण येणाऱ्या काळातील सर्वच संभाव्यता त्यांना जाणवतातच असे नाही. अशा अनपेक्षित व अकल्पित प्रसंगांना सामोरे जाण्याची तयारी संविधानाच्या मूळ तरतुदींमध्ये त्यामुळेच असण्याची शक्यता नसते. घटना दुरूस्तीच्या माध्यमातून संविधान काळाची नवनवी आव्हाने पेलू शकते. बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेऊ शकते.

Research Hub International Journal

## उत्तम समतोल

सामान्य कायद्यापेक्षा संविधानाचा दर्जा वेगळा आणि वरचा असला पाहिजे. संविधानात लवचिकता असावी. संविधानात दुरूस्ती करण्याची पध्दती खूप सोपीही असता कामा नये. बदल तर करता यावेत पण संविधानाची पायाभूत तत्वे अबाधित राखली जावीत. संविधानाच्या सत्वात सातत्य राखले जाणे गरजेचे असते. बदलत्या काळानुरूप वाढलेल्या लोकांच्या आशा आकांक्षा पूर्ण करण्याच्या आड संविधान येऊ नये. भारतीय घटनेत जिची योजना करण्यात आली आहे ती घटना दुरूस्तीची पध्दती जगातील अद्वितीय पध्दती आहे. या वैशिष्टयपूर्ण पध्दतीमुळे तिला ताठर म्हणता येत नाही. त्याचप्रमाणे लवचिकही म्हणता येणार नाही. या दोन प्रकारांमधील 'उत्तम समतोल' भारतीय घटनेने साधला असल्याची साक्ष के. सी. व्हेअर देतात ती यामुळेच.

भारतीय घटना तीन मार्गांनी बदलली जाऊ शकते. घटनेच्या काही तरतुदी राज्यांच्या सल्ल्याने वा राज्यांच्या विनंतीवरून साध्या बहुमताने बदलू शकते. साध्या बहुमताने काही घटनात्मक महत्वाच्या तरतुदीही संसद बदलू शकते. घटनेच्या काही तरतुदी बदलण्यासाठी संसदेच्या बहुमताने मान्यता दिल्यानंतर निम्म्याहून अधिक घटक राज्यांच्या विधिमंडळांचीही मान्यता लागते. वरील तरतुदीखेरीज घटनेच्या उरलेल्या सर्व तरतुदी घटनेच्या 368 व्या कलमात दिल्या गेलेल्या पध्दतीने दोन्ही सभागृहांतील एकूण सदस्य संख्येच्या बहुमताने व हजर असलेल्या मतदान करणाऱ्या सदस्य संख्येच्या बहुमताने बदलल्या जाऊ शकतात. कोणत्याही प्रकाराने घटना बदलली तरी त्या विधेयकावर राष्ट्रपतीची स्वाक्षरी होणे त्याच दिवशी ते अमलात येते.

## संविधानीक तरतूदी

घटनेच्या सर्वाधिक वादग्रस्त ठरलेल्या दुरूस्त्या म्हणजे ज्यांनी मूलभूत हक्कांवर परिणाम केले आहेत त्या होत. राज्याने समाजाला दुर्बल घटकांच्या व अनुसूचित जाती जनजातींच्या विकासासाठी विशेष सवलतींची व्यवस्था केल्यास राज्याचे ते वर्तन भेदभावकारक (Discriminatory) समजले जाणार नाही. घटनेच्या सातव्या दुरूस्तीने (1956) 16 व्या कलमात फेरफार करून असे ठरविले आहे की, राज्याच्या वा केंद्रशासित प्रदेशाच्या नोकरीत प्रवेश मिळण्यासाठी उमेदवार त्या राज्याचा वा प्रदेशाचा रहिवासी असणे आवश्यक ठरविण्याचा संसदेला अधिकार आहे.

मूलभूत हक्कांच्या प्रकरणात 31–ड हे नवे कलम घालून राष्ट्रविघातक कारवाया व संघटना यांना प्रतिबंध करण्याचा अधिकार संसदेला दिला होता. 1977 च्या 43 व्या घटना दुरूस्तीने 31–ड हे कलम रद्द ठरवले असून 31–क या कलमाची व्याप्ती पुन्हा पूर्ववत 39(ब) आणि (क) या कलमातील मार्गदर्शक तत्वांपुरती मर्यादित केली असल्यामुळे 42 व्या घटना दुरूस्तीने मूलभूत हक्कांवर केलेले अतिक्रमण व संभाव्य धोके दूर झाले. 1979 च्या 44 व्या घटना दुरूस्तीने भरून काढली आणि घटना पुन्हा मूळ स्वरूपात आणली. 44 व्या दुरूस्तीने संपत्तीचा हक्क मूलभूत हक्कांच्या यादीतून काढला आणि वैधानिक हक्क म्हणून

घटनेत त्याचा अन्यत्र अंतर्भाव केला. 42 व्या घटना दुरूस्तीने घुसडलेल्या नव्या तरतुदी वगळणे, बदललेल्या तरतुदी पुन्हा मूळ स्वरूपात आणणे, काही नव्या तरतुदी घालून घटना दुरूस्तीच्या अधिकारांचा गैरवापर होऊ नये किंवा काही मूलभूत हक्क कधीच काढून घेता येऊ नयेत असा बंदोबस्त करणे अशा अनेक प्रकारचे फेरबदल 44 व्या दुरूस्तीन्वये करण्यात आल्यामुळे तिचीही व्याप्ती बरीच मोठी होती. 42 व्या घटना दुरूस्तीने संसदेचा घटना दुरूस्तीचा अधिकार अमर्याद केला होता.

बत्तिसाव्या दुरूस्तीअन्वये (1974) 371–ड आणि 371–ई या दोन कलमांची घटनेत भर घालण्यात येऊन त्यांच्याद्वारे आंध्रप्रदेश या राज्यसाठी काही विशेष तरतुदी करण्यात आल्या. स्वतंत्र तेलंगण राज्यासाठी या राज्यात जे आंदोलन पेटले होते त्यामुळे तिथे एक प्रशासकीय न्यायाधिकरण आणि एक केंद्रीय विद्यापीठ स्थापन करण्याच्या तरतुदी घटनेत करणे शासनास भाग पडले होते. सदतिसाव्या घटनादुरूस्ती अन्वये (1975) अरूणाचल प्रदेशाला विधानसभा व मंत्रिमंडळ तयार करण्याची परवानगी मिळाली. 1986 च्या त्रेपन्नाव्या घटना दुरूस्तीन्वये मिझोरामचे राज्य अस्तित्वात आले. छपन्नाव्या दुरूस्तीने (1987) गोवा, दीव व दमण या केंद्राासित प्रदेशातून गोवा वेगळा काढून त्याला राज्याचा दर्जा दिला आणि दीव–दमण असा केंद्रशासित प्रदेश निर्माण केला. एकोणसत्तराव्या घटना दुरूस्तीनुसार (1991) दिल्ली या केंद्रशासित प्रदेशासाठी विधानसभेची व मंत्रिमंडळाची तरतूद करण्यात आली.

छत्तीसगड, उत्तरांचल आणि झारखंड आी तीन नवी राज्ये भारतीय संघराज्यात 2000 साली अस्तित्वात आली असली तरी त्यांचया निर्मितीसाठी घटना दुरूस्त्या कराव्या लागल्या नाहीत. अनुक्रमे मध्यप्रदेश पुनर्रचना कायदा, उत्तरप्रदेश पुनर्रचना कायदा आणि बिहार पुनर्रचना कायदा या कायद्यांनी त्या तीन घटक राज्यांना जन्म दिला. सातव्या दुरूस्ती अन्वये (1956) संसदेने कायद्यान्वये कलेच्या वा इतिहासाच्या दृष्टीने राष्ट्रीय महत्वाची म्हणून जी स्मारके, स्थळे वा वास्तू ठरविल्या असतील त्यांची मोडतोड, विकृती, विनाश, उच्चाटन, वासलात वा निर्यात यापासून संरक्षण करणे ही राज्याची जबाबदारी ठरविण्यात आली आहे.

1984 च्या एक्कावन्नावी घटना दुरूस्ती आणि विधानसभांमधील अनुसूचित जाती व जमातीच्या राखीव जागांशीच संबंधित आहे. 1987 च्या सत्तावन्नाव्या घटना दुरूस्तीनुसार नागालँड, मेघालय, मिझोराम आणि अरूणाचल प्रदेश येथील अनुसूचित जनजातींना लोकसभेत तसेच नागालँड व मेघालय यांच्या विधानसभांमध्ये आरक्षण मिळाले. 1995 ची सत्याहत्तरावी घटना दुरूस्ती त्याचप्रमाणे इ.स. 2000 ची एक्क्याऐंशीवी आणि ब्यांशीवी घटना दुरूस्ती या तिन्ही दुरूस्त्या सरकारी पदांवर आरक्षणपात्र वर्गांना समानसंधी मिळण्याशी संबंधित अहोत. नवव्या अनुसूचित कायद्यांचा समावेश करणाऱ्या काही घटना दुरूस्त्या आहेत. सत्तेचाळीसाच्या घटना दुरूस्ती (1984), सहासष्ठावी घटना दुरूस्ती (1990), शहात्तरावी घटना दुरूस्ती (1994) आणि अठ्ठयातरावी घटना दुरूस्ती (1995) या घटना दुरूस्त्यांचा या संदर्भात उल्लेख करता येइल. एकात्तराव्या घटना दुरूस्तीने (1992)

घटनेच्या आठव्या अनुसूचित कोकणी, मणिपुरी, नेपाळी या भाषांचा समावेश केला असून सूचीतील भाषांची एकूण संख्या अठरा झाली आहे.

घटना दुरूस्तीने (1985) पक्षांतर करणाऱ्या सदस्याला अपात्र ठरवले आहे. अठ्ठावन्नाव्या घटना दुरूस्तीने (1987) राष्ट्रपतीला संविधानाचे अधिकृत हिंदी भाषंतर प्रसिध्द करण्याचा अधिकार दिला. शहाऐंशीच्या घटना दुरूस्तीन्वये (2002) प्राथमिक शिक्षण हा व्यक्तीचा मूलभूत हक्क म्हणून मान्य करण्यात आला. घटनेच्या सरनाम्यातील भारताचे वर्णन 'सार्वभौम लोकशाही गणराज्य' असे मुळात होते. त्याजागी या दुरूस्तीने ते 'सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य' असे केले. सरनाम्यातच शेवटी 'राष्ट्राची एकता' असे जे शब्द होते, त्यांच्या जागी 'राष्ट्राची एकता व अखंडता' अशा शब्दांचा प्रयोग केला. मूलभूत हक्कांच्या संदर्भात दोन महत्वाचे बदल या दुरूस्तीने केले. पहिला असा की 31–क या कलमात बदल करून संसदेने कोणत्याही मार्गदर्शक तत्वांच्या अनुरोधाने केलेल्या कायद्याला न्यायालयीन पुनरावलोकनापासून मुक्त केले, आणि दुसरा बदल 31–ड या कलमाची भर घालून करण्यात आला होता. त्यानुसार राष्ट्रविरोधी कारवायांना व संस्थांना प्रतिबंध घालण्याचा न्यायालयीन पुनर्विलोकनमुक्त असा अधिकार संसदेस मिळाला होता. मार्गदर्शक तत्वांच्या प्रकरणात चार नवी तत्वे या दुरूस्तीअन्वये अंतर्भूत करण्यात आली होती. 4–अ या नव्या प्रकरणाद्वारे नागरिकांची मूलभूत कर्तव्ये निर्देशित करण्यात आली होती.

संविधान अमलात आणण्यात काही असूर राहिली असेल तर तो दोष सविधानाचा नसून त्याची अंमलबजावणी करणाऱ्यांचा आहे. त्यामुळे पुनर्विलोकनच करायचे तर राज्यकर्त्यांनी स्वतःचे केले पाहिजे. कोणतेही संविधान किती चांगले किंवा वाईट आहे हे त्याला राबवणाऱ्या स्त्री पुरूषांच्या चांगले–वाईट असण्याच्या प्रमाणावर अवलंबून असते या डॉ. आंबेडकरांच्या विधानाचा हवाला देऊन संविधानाच्या परीक्षणाचे विरोधक असा आक्षेप घेत होते की राज्यकर्ते स्वतःच्या नाकर्तेपणा लपवण्यासाठीच संविधानाच्या पुनर्विलोकनाचा घाट घालत आहेत. भारतीय लोकशाहीत शिरलेल्या अपप्रवृत्तींना प्रभावीपणे आळा घातला जाईल असे उपाय घटनेद्वारेच केले पाहिजेत किंवा बदललेल्या ज्ञानविज्ञानाने जो नवा समाज निर्माण केला त्याच्या गरजा पूर्ण करणाऱ्या तरतुदी घटनेत केल्या जाणे गरजेचे आहे. असे विचार जयप्रकाश नारायण यांच्यापासून कॉंग्रेसने नेमलेल्या स्वर्णसिंह समितीपर्यंत अनेकांनी व्यक्त केले होते.

संविधानसभेपासून त्या विचाराच्या पूर्वसुरींनी भारतीय संविधानाबद्दल प्रतिकूल भूमिका घेतली होती हा इतिहास आहे. हे संविधान परकीय आहे. येथील पूर्वपरांमध्ये त्याची पाळेमुळे आढळत नाहीत ते येथील संस्कृतीशी व सभ्यतेशी विसंगत आहे अशी विधाने या पक्षाच्या मान्यवर पाठीराख्यांनी वेळोवेळी केली आहेत.

Research Hub International Journal

## आयोगाच्या शिफारशी

मूलभूत हक्कांच्या संदर्भात आयोगाने काही शिफारशी पुढीलप्रमाणे केल्या आहेत. व्यक्तीच्या आविष्कार स्वातंत्र्यात प्रसारमाध्यमांचे स्वातंत्र्य, मते धारण करण्याचा हक्क, माहिती आणि विचार मिळविण्याचा व प्रसूत करण्याचा हक्क यांचा अंतर्भाव असावा, अवमान याचिकेच्या प्रसंगी आरोपीला आपली बाजू मांडून आपल्या कृत्याची यथार्थता पटवून देण्याची किंवा ते सार्वजनिक हितार्थ असल्याचे स्पष्टीकरण करण्याची संधी देण्याचा अधिकार न्यायालयांना असावा, कोणत्याही व्यक्तीचा छळ होऊ नये किंवा तिला क्रूर, अमानुष व अपमानकारक वर्तणूक किंवा शिक्षा भोगावी लागू नये, जिला आपल्या जीविताच्या आणि स्वातंत्र्याच्या हक्काला बेकायदेशीरपणे वंचित केले गेले आहे अशा प्रत्येक व्यक्तीला नुकसान भरपाईचा प्रवर्तनीय (अमलात आणण्याजोगा) हक्क असावा, प्रत्येकाचे आपले खाजगी व कौटुंबिक जीवन, घर आणि पत्रव्यवहार याचा आदर केला जावा. अर्थात या सर्वच हक्कांवर वाजवी मर्यादा–राज्यची सुरक्षा, सार्वजनिक सुरक्षितता, सुव्यवस्था आणि गुन्हेगारीस प्रतिबंध अशा कारणास्तव घालण्याचा राज्यसत्तेचा अधिकार अबाधितच ठेवावा. व्यक्तीला शक्य तितक्या लवकर आणि प्रभावी स्वरूपात न्याय मिळेल अशी तरतूद घटनेत करावी. लोकसंख्या नियंत्रणाखाली शिक्षण व लहान कुटुंबाच्या आदर्शाचा प्रसार यांचा वापर राज्यसत्तेकडून व्हावा असे नवे मार्गदर्शक तत्व घटनेत टाकण्याची शिफारस आयोगाने केली आहे.

## निष्कर्ष

आज संपूर्ण भारत हा गेल्या 75 वर्षापासून या देशाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जी राज्यघटना दिलेली आहे. त्याच आधारावर भारताचा विकास होत चाललेला आहे. भारतातील 6000 ते 6500 जातीच्या सर्व समस्या लक्षात घेवून भारतातील एकूण असलेल्या सात धर्माचा विचार करून अनेक आदिवासी जामतीचा विचार करून कोणावरही अन्याय, अत्याचार होणार नाही याचे भान ठेवून या देशाला या महामानवाने एक महत्वपूर्ण दस्तऐवज दिला आहे. तो सांभाळणे आणि त्या आधारावर चालणे हे आमचे प्रथम कर्तव्य असले पाहिजे. सोबतच आम्ही आपल्या सामाजिक मूल्याचा देखील विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. राज्यघटनेनुसार दिलेल्या मानवतावादी मूल्यांचा विचार ज्यामध्ये स्वातंत्र, समता, बंधुता आणि न्याय याचे देखील आपल्याला भान असणे अत्यंत आवश्यक आहे. आज जी राज्यघटना या देशाला डॉ. बी. आर. आंबेडकरांनी दिली, ती पिढयांन्पिढया कायम आणि अबाधित राहील. तिला कोणीही संपुष्टात आणू शकणार नाही आणि असे कृत्ये ज्याने केले तो संपल्याशिवाय राहणार नाही. तेव्हा मानवी सामाजिक मूल्य आणि भारतीय राज्यघटना या दोन्हीमध्ये समतोल राहावा असेच मला मांडावेसे वाटते.

Research Hub International Journal

**संदर्भः**


- आंबेडकर, बी. आर. (2019). भारत का संविधान. जयपूर :बुध्दम पब्लिशर्स.
- कुमार, महेश. (2021). भारतीय समाज एवं सामाजिक न्याय. दिल्लीःदृष्टी पब्लिकेशन्स.
- कुमारी, सीमा. (2009). महिला अधिकार और भारतीय प्रावधान. आगराःउपकार प्रकाशन
- दुर्गादास, बसु. (1998). भारत का संविधान. नई दिल्ली :प्रोन्हिसनल ऑफ इंडिया लि.
- देशमुख, बी. टी. (1992). भारतीय संविधान. नागपूर : पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स.
- सीरसवल, डी. आर. (2007). भारतीय समाज मे नैतिक मूल्यों की आवश्यकता. *परमिता,* 8 (8)
- शर्मा, डी. एल. (2005). शिक्षा तथा भारतीय समाज. आगरा :सुर्या पब्लिकेशन्स.


Research Hub International Journal